सन २०२६-२७ मध्ये Calphos-D (Calcium Glycerophosphate + Vit D३ Soft gel capsule), Capsule Omega ३, Syrup Omega ३ या औषधांची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत करण्यास लेखाशिर्ष २२१०K०६१ अंतर्गत ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (अनिवार्य) या उद्दिष्टाखाली रु.४,९९,९९,८७४/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-१२२६/प्र.क्र.१२३/खरेदी कक्ष

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : २४ जुलै, २०२६

वाचा :-

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५
२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६
३) मा.प्रधान सचिव-१, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र.पु.मा.२०२५/प्र.क्र.२१८/एमएमजीपीए/खरेदी कक्ष, दि.३०.१०.२०२५
४) शासन पत्र क्र.एसडीएल-४४२६/प्र.क्र.२६/खरेदी कक्ष, दि.१२.०२.२०२६
५) उपसंचालक (खरेदी कक्ष) आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.२९६९-७१/आसेआ/ खरेदी कक्ष/औषधांच्या खरेदी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत/२०२६, दि.०७.०७.२०२६

प्रस्तावना :-

Omega ३ Capsule , Omega ३ Syrup, आणि Calphos-D (Calcium Glycerophosphate + Vit D३ Soft gel capsule) या नाविन्यपूर्ण उत्पादनाचा राज्य औषधी सूची (एस.डी.एल.) मध्ये समावेश करण्यास वाचा मधील क्र.४ येथील शासन पत्र दिनांक १२.०२.२०२६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर औषधांची आरोग्य संस्थांकडील आवश्यकता विचारात घेऊन अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता व बाल संगोपन शालेय आरोग्य, पुणे व सहसंचालक, आरोग्य सेवा (प्राआकेंद्र/उपकेंद्र/दवाखाने), मुंबई यांनी औषधांची मागणी संख्या, अंदाजित दर, पुरवठा यादीसह आयुक्तालयास दि.०४.०३.२०२६ व दि.२७.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला होता. त्यानुषंगाने, उपसंचालक (खरेदी कक्ष) आरोग्य सेवा, मुंबई यांनी वाचा क्र. ६ येथील दि.०७.०७.२०२६ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन Calphos-D (Calcium Glycerophosphate + Vit D३ Soft

gel capsule) व Capsule Omega ३ व Syrup Omega ३ इ. औषधी खरेदी करण्यासाठी लेखाशीर्ष २२१०के०६१ अंतर्गत ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (अनिवार्य) या उद्दिष्टाखाली एकूण रुपये ४,९९,९९,८७४/- इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांकरीता परिशिष्ट-"अ" Calphos-D (Calcium Glycerophosphate + Vit D३ Soft gel capsule) व परिशिष्ट-"ब" मधील Capsule Omega ३ व Syrup Omega ३ या औषधींची खरेदी करण्यासाठी लेखाशिर्ष २२१०के०६१ अंतर्गत ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (अनिवार्य) या उद्दिष्टाखाली एकूण रुपये ४,९९,९९,८७४/-(चार कोटी नव्व्यान्नव लाख नव्व्यान्नव हजार आठशे चौऱ्याहत्तर फक्त) इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. अटी व शर्ती :-

(१) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांनी परिशिष्ट-"अ" मधील Calphos-D (Calcium Glycerophosphate + Vit D३ Soft gel capsule) या औषधींची खरेदीसाठी प्रचलित निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करावा. तसेच परिशिष्ट-"ब" मधील अ.क्र.१ व २ येथील Capsule Omega ३ व Syrup Omega ३ या औषधींची उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि.०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्र.३ मधील ३.२.६ नुसार एकलस्त्रोत पध्दतीने खरेदी प्रक्रियेचा अवलंब करण्यात यावा.

(२) खरेदी करण्यात येणाऱ्या औषधांचे विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. परिशिष्ट-"अ" मधील औषधाचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल, अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात आल्यानंतर सदर बाबींची खरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांनी शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित पध्दतीने खरेदी करावयाच्या बाबींची खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी. तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

(४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

(५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post-dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

(६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

(७) सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी. तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. सदरहू खरेदीच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा तपशील मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई व उपसंचालक (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा, मुंबई यांनी शासनास सादर करावा.

(८) या कामी होणारा खर्च, "मागणी क्र. आर-१, (०३) महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण (०३) (०१) महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत औषधे, औषधी साहित्य, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी (अनिवार्य) ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) २२१० के ०६१ या लेखाशीर्षा खाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतुन भागविण्यात येऊन तो सदरहू लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

(९) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

३. उपरोक्त अनुक्रमांक १ ते ९ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची सर्वस्वी जबाबदारी, आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई व उपसंचालक (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा, मुंबई यांची राहील.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु.क्र.४, नियम क्र.७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२४१८११३४१९१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT HARIDAS WADE

Digitally signed by CHANDRAKANT HARIDAS WADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=9474E7143B2BC3FD96E8D7BF07D1CE51DE8461D4C34AE1E3F643C11B54523936, cn=CHANDRAKANT HARIDAS WADE
Date: 2026.07.24 18:29:28 +05'30'

(चंद्रकांत ह. वडे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
४) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता व बाल संगोपन शालेय आरोग्य, पुणे.
५) सह संचालक,आरोग्य सेवा,रुग्णालये (राज्यस्तर),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई
६) सह संचालक, आरोग्य सेवा, (खरेदी कक्ष),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई
७) सह संचालक आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई
८) सहसंचालक, आरोग्य सेवा (प्राआकेंद्र/उपकेंद्र/दवाखाने), मुंबई.
९) उपसंचालक (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा, मुंबई.
१०) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता),मुंबई
११) महालेखापाल, महाराष्ट्र-२(लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता),नागपूर
१२) अधिदान व लेखाधिकारी,मुंबई
१३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई.
१४) निवडनस्ती (खरेदी कक्ष)

(शासन निर्णय क्र.प्रशामा-१२२६/प्र.क्र.१२३/खरेदी कक्ष,दिनांक २४जुलै,२०२६ चे सहपत्र)

परिशिष्ट- अ

Sr. No.	Name of Item	Total	Rate	Amount
1	Calphos-D (Calcium Glycerophosphate + Vit D3 Soft gel capsule)	1097935	22.77	2,49,99,980
Total				**2,49,99,980/-**

परिशिष्ट- ब

Sr. No.	Name of Item	Total	Rate	Amount
1	Capsule Omega 3	750000	20	1,50,00,000
2	Syrup Omega 3	14306	699	99,99,894
Total				**2,49,99,894/-**